# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनाट क्रमांक २४५-२२** **दिनांक ०९/०८/२०२**

## अनोळखी इसमासोबत मित्राचे चालु असलेले भांडण सोडविण्याकरीता गेलेल्या युवकाचा खुन करण्या-या अनोळखी आरोपीतास अटक करण्यात गुन्हे शाखा, कक्ष-३ विरार यांना यश.

दिनांक ०५/०८/२०२२ रोजी ०१.३० वा चे सुमारास विरार पोलीस ठाणे हद्दीमध्ये जय जगदंबा मेडीकल समोर मकवाना कॉम्लेक्स, गोपचरपाडा, चंदनसार रोड विरार पूर्व येथे फिर्यादी नामे मोहंमद हैदरअली युनुस मन्सुरी, वय ३८ वर्षे, व्यवसाय रिक्षा चालक, रा. गोविंद नगर, गोपचरपाडा, विरार पूर्व ता.वसई जिल्हा पालघर यांचा भाऊ नामे मोहंमद सददाम हुसैन युनूस मन्सुरी (मयत) व त्याचे मित्र मुमताज मन्सुरी व अन्वरुल मोहम्मंद मन्सुरी असे उभे असताना अन्वरुल मोहम्मद मन्सुरीचे अनोळखी इसमासोबत चालू असलेले भांडण सोडविण्यासाठी फिर्यादीचा भाऊ सददाम हुसैन युनूस मन्सुरी हा गेला असता, त्याचा राग येवून अनोळखी आरोपीत इसमाने सददाम याचे पोटाचे डावे बाजूस व पाठीवर चाकूने वार करुन त्यास गंभीर जखमी केले. सदर गंभीर जखमामुळे सददाम याचा उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याने विरार पोलीस ठाणे येथे दिनांक ०८/०८/२०२२ रोजी गुन्हा रजि नंबर ७५४/२०२२ भा.द.वी.सं. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमूद गुन्हा करुन तेथून पलायन करणारा अनोळखी आरोपी याचा गुन्हे शाखा कक्ष -३ अधिकारी व अंमलदार यांनी कसुन शोध घेतला. आरोपीत याने नमूद गुन्हयाच्या घटनास्थळी कोणताही पुरावा सोडलेला नसताना कौशल्यपुर्वक तांत्रिक तपास करुन व गोपनीय माहिती प्राप्त करुन अनोळखी आरोपी याची ओळख पटवून आरोपीत नामे – दानिश सलिम शेख, वय २५ वर्षे, रा. मिरारोड पुर्व, ठाणे यास दिनांक ०९/०८/२०२२ रोजी कुर्ला मुंबई परिसरातुन ताब्यात घेण्यात आलेले आहे. वर नमूद आरोपीत याने गुन्हा केल्याचे कबुल केले आहे. सदरचा गुन्हा दाखल झाल्यापासून २४ तासाच्या आत गुन्हयाची उकल करुन अनोळखी असलेल्या आरोपीताचे नाव व ओळख निष्पन्न करुन त्यास जेरबंद करण्यात गुन्हे शाखेला यश प्राप्त झाले आहे.

वरील कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय) अति कार्य. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त(गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, पो.हवा/ अशोक पाटील, मनोज चव्हाण, शंकर शिंदे. सचिन घेरे, सागर बारवकर, पो.ना/ मनोज सकपाळ, पो.अं/ अश्विन पाटील सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष - ३ यांनी कठोर परिश्रम घेवुन उकृष्टरित्या पार पाडली आहे.



**-------ooooo-------**